RNI No. MAHBIL /2009/37831



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ४४(५)] सोमवार एप्रिल २४, २०१७/वैशाख ४, शके १९३९ [पृष्ठे ३६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १०४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ एप्रिल २०१७

अधिसूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.

क्रमांक टीईएम. २०१६/सीआर ४७३ (भाग -३)/टीई-४.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या कलम २३ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासन अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण, क्रमांक टीईएम. २०१५/सीआर ५३६/टीई. ४, दिनांक ११ मार्च २०१६ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याव्दारे पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षांना (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान) द्यावयाचे प्रवेश विनियमित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे:—

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.—

(१) या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१७ असे म्हणावे.

(२) ते दिनांक २४ एप्रिल २०१७ पासून अंमलात येतील.

२. व्याख्या.— (१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. २८), असा आहे ;

(ख) " प्रवेश उपस्थिती केंद्र " याचा अर्थ, जेथे उमेदवार प्रवेशाबाबतची कागदपत्रे सादर करून आणि शुल्काचा भरणा करून प्रवेश निश्चित करण्यासाठी उपस्थित राहील असे केंद्र, असा आहे ;

(ग) " अखिल भारतीय जागा " याचा अर्थ, पात्र भारतीय उमेदवारास उपलब्ध होणा-या जागा, असा आहे ;

(घ) " आवेदनपत्राचा नमुना " याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा विहित नमुना, असा आहे ;

(ड) " स्वायत्त संस्था " याचा अर्थ, ज्या संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे अशी संस्था, असा आहे ;

(च) " केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) जागा " याचा अर्थ, सक्षम प्राधिका-याकडून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) ज्या जागांवर प्रवेश देण्यात येतात अशा जागा, असा आहे ;

(छ) " पाठयक्रम " याचा अर्थ, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान यामधील पूर्ण वेळ पदवीपूर्व तांत्रिक पाठयक्रम, असा आहे;

(ज) " विभाग " याचा अर्थ उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) " पात्र उमेदवार " याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) नुसार शासनाने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार विविध पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठीची पात्रता धारण करणारा उमेदवार, असा आहे ;

(त्र) " सुविधा केंद्र " याचा अर्थ, जेथे आवेदनपत्रासंबंधातील सामग्रीची विक्री, ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी व तक्रारींचे निवारण करणे यांसारख्या सेवा पुरविल्या जातात, असे केंद्र, असा आहे ;

(ट) " मूळ विद्यापीठ " याचा अर्थ, या नियमाच्या नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विद्यापीठ क्षेत्र, असा आहे ;

(ठ) " एचएससी " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १२वी) परीक्षा अथवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे, त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे ;

(ड) " संस्थास्तरीय कोटा " याचा अर्थ, शासनाने व समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी जाहीर केल्यानुसार पात्र उमेदवारांच्या प्रवेशासाठी संस्थास्तरावर उपलब्ध असणा-या जागा, असा आहे ;

(ढ) " परस्पर गुणवत्ता " याचा अर्थ, उमेदवारांच्या विविध वर्गांच्या प्रवर्गाच्या संबंधात सक्षम प्राधिकारी यांनी जाहीर केलेला गुणानुक्रम, असा आहे ;

(ण) " जेईईमुख्य परीक्षा " याचा अर्थ, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ नवी दिल्ली, व्दारेत्या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात येणारी संयुक्त प्रवेश परीक्षा, असा आहे ;

(त) " अल्पसंख्याकांसाठी जागा " याचा अर्थ, ती संस्था ज्या अल्पसंख्याक समाजाकरिता आहे अशा, राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता राखून ठेवलेल्या जागा, असा आहे ;

(थ) " बिगर स्वायत्त संस्था " याचा अर्थ, ज्या स्वायत्त संस्था नाहीत अशा संस्था, असा आहे ;

(द) " मूळ विद्यापीठ क्षेत्राबाहेरील (ओएचयू) " याचा अर्थ, मूळ विद्यापीठ क्षेत्राबाहेरील क्षेत्र, असा आहे ;

(ध) " भारताचे समुद्रपार नागरिकत्व " याचा अर्थ, सरकारने नागरिकत्व अधिनियम, १९५५ च्या कलम ७क अन्वये घोषित केलेला भारताचा (समुद्रपार) नागरिक म्हणून नोंदणी केलेला उमेदवार / व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये भारतीय वंशाच्या व्यक्तींचा समावेश होतो ;

स्पष्टीकरण.— या खंडाच्या प्रयोजनार्थ , सर्व विद्यमान भारतीय वंशाच्या व्यक्तीं ज्यांनी गृह मंत्रालय भारत सरकारच्या अधिसूचना क्र. २६०११/०४/९८/एफ (एक), दिनांक १९ ऑगस्ट २००२ अनुसार नोंदणी केलेली असून त्या कार्डधारक आहेत व त्यांना आता गृह मंत्रालय भारत सरकारच्या अधिसूचना क्र. २५०२४/९/२०१४/एफ (एक), दिनांक ९ जानेवारी २०१५ अनुसार भारताचे कार्डधारक समुद्रपार नागरिक समजण्यात येईल ;

(न) " अर्हता परीक्षा " याचा अर्थ, ज्या परीक्षेच्या आधारे एखादा उमेदवार प्रवेशाकरिता पात्र होतो अशी परीक्षा किंवा तिला समतुल्य असलेली परीक्षा, असा आहे ;

(प) " एसएससी " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षा किंवा मान्यताप्राप्त मंडळाकडून देण्यात येणारे त्यास समतुल्य असे प्रमाणपत्र, असा आहे ;

(फ) " अधिसंख्य जागा " याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने आणि शासनाने मान्यता दिलेल्या, मंजूर प्रवेश क्षमतेहून अधिक असतील अशा जागा, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्द प्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. आवेदनपत्र मागविणे.—(१) सक्षम प्राधिकारी, शैक्षणिक वर्षातील ज्या व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) किंवा इतर प्रवेश परीक्षा आवश्यक आहे, अशा पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी आणि/किंवा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवतील.

(२) सक्षम प्राधिकारी, शैक्षणिक वर्षातील ज्या व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी अधिनियमातील तरतुदीनुसार सामायिक प्रवेश परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे, अशा पदवीपूर्व तांत्रिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवतील.

(३) सक्षम प्राधिकारी, शैक्षणिक वर्षातील ज्या व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीय अधिनियमातील नियम व विनियमातील तरतुदीनुसार समुचित प्राधिकरणाने घेतलेली परीक्षा लागू केली असेल, अशा पदवी पूर्व अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवतील.

(४) व्यावसायिक पाठ्यक्रमाकरिता उपलब्ध जागांवर उमेदवारांच्या प्रवेशासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती असेल,–

(क) या नियमाच्या नियम ७ (१), ७ (२) , ७ (३) आणि ७ (५) (ख) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार सक्षम प्राधिकरणाकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश मिळावा यासाठी आवेदनपत्र सादर करतील ;

(ख) या नियमांच्या नियम ७ (४) व ७ (५) (क) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार प्रथम सक्षम प्राधिकरणाकडे कागद पत्रांची तपासणी करण्यासाठी व नियम १३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देणे संस्थाना शक्य व्हावे म्हणून आवेदनपत्र सादर करतील व त्यानंतर संबंधित संस्थेकडे आवेदनपत्र सादर करतील ;

(५) उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना भरतेवेळी लागू असतील त्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित सक्षम प्राधिका-याने विहित केलेल्या आवश्यक प्रपत्रात सादर करावीत.

४. सीईटी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात परीक्षेचे माध्यम, पद्धती, अभ्यासक्रम व वेळापत्रक इत्यादी जाहीर करणे.-

(१) सक्षम प्राधिकरण, राज्य सामायिक प्रवेश परीक्षेसंबंधी (सीईटी) पुढील माहिती घोषित करील :–

(क) परीक्षेचे माध्यम ;

(ख) प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ;

(ग) परीक्षा घेण्याची पद्धत ;

(घ) परीक्षेचे वेळापत्रक ;

(ड) प्रवेशपत्र वितरण ;

(च) परीक्षेचा निकाल जाहीर करणे ;

(छ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (कॅप) वेळापत्रक, इत्यादी.

(२) याशिवाय सक्षम प्राधिकारी, संचालक, तंत्रशिक्षण यांचेशी विचारविनिमय करून सीईटी परीक्षेचा अभ्यासक्रम व इतर माहिती घोषित करील.

(३) संबंधित संचालनालाय " माहिती पुस्तक " प्रसिद्ध करेल.

५. **उमेदवारीचे प्रकार,—**

(१) महाराष्ट्र राज्य उमेदवारी,—

प्रकार (१)	पात्रतेचे निकष (२)	मूळ विद्यापीठ (३)
" ए "	**(क) प्रथम वर्षासाठी** :–	
	(एक) महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून एसएससी आणि तसेच एचएससी किंवा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका किंवा विज्ञान पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार ; आणि	अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे ठिकाण ज्या विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रांतर्गत येत असेल
	(दोन) महाराष्ट्र राज्याचा एकतर अधिवासी असलेला आणि / किंवा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला आहे, असा उमेदवार.	ते विद्यापीठ.
	(ख) थेट व्दितीय वर्षाकरिता :–	
	(एक) (१) अभियांत्रिकी प्रवेशाकरिता : महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून एसएससी किंवा एचएससी तसेच अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान पदविका किंवा विज्ञान पदवी अथवा तिला समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असलेला उमेदवार ;	
	(२) औषधनिर्माणशास्त्र प्रवेशाकरिताः महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून एचएससी आणि औषधनिर्माणशास्त्र पदविका उत्तीर्ण असलेला उमेदवार ;	
	(दोन) महाराष्ट्र राज्याचा एकतर अधिवासी असलेला आणि/किंवा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला आहे, असा उमेदवार.	
" बी "	जो उमेदवार वरील प्रकार-ए मधील निकषाची पूर्तता करीत नसेल, परंतु तो किंवा त्याचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असून त्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे, असा उमेदवार.	अधिवास प्रमाणपत्र देणा-या प्राधिकरणाचे ठिकाण ज्या विद्यापीठाच्या क्षेत्रांतर्गत येत असेल ते विद्यापीठ.
" सी "	जो उमेदवार वरील प्रकार-ए व प्रकार-बी मधील निकषाची पूर्तता करीत नसेल, परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई केंद्र शासनाचे किंवा केंद्र शासनाच्या उपक्रमातील कर्मचारी आहेत व ज्यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यात झालेली आहे व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेस आवेदनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या तारखेच्या आधी ते महाराष्ट्र राज्यात कामावर रुजू झालेले आहेत, असा उमेदवार.	उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे ठिकाण ज्या विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रात येत असेल ते विद्यापीठ.
" डी "	जो उमेदवार वरील प्रकार-ए, प्रकार-बी व प्रकार-सी मधील निकषाची पूर्तता करीत नसेल, परंतु ज्या उमेदवाराचे वडील किंवा आई महाराष्ट्र शासनाचे किंवा महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमाचे कर्मचारी किंवा निवृत्त कर्मचारी आहेत, असा उमेदवार.	उमेदवाराच्या वडिलांच्या किंवा आईच्या पदस्थापनेचे किंवा निवृत्तीनंतर स्थायिक झाल्याचे ठिकाण किंवा जर महाराष्ट्राबाहेर प्रतिनियुक्ती करण्यात आली असेल तर अंतिम पदस्थापनेचे ठिकाण ज्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रात येत असेल ते विद्यापीठ.

प्रकार (१)		पात्रतेचे निकष (२)	मूळ विद्यापीठ (३)
"ई"	(क)	प्रथम वर्षाकरिता- महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेची एसएससी आणि/किंवा एचएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला, महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील रहिवासी असलेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार	उमेदवाराचा मूळ विद्यापीठाबाहेरील किंवा राज्यस्तरावरील जागांसाठी विचार करण्यात येईल.
	(ख)	थेट द्वितीय वर्षाकरिता : महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील किंवा महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त संस्थेमधून एसएससी आणि/किंवा एचएससी परीक्षा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान किंवा औषध निर्माण शास्त्रपदविका अथवा तिला समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेला, महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील रहिवासी असलेला आणि ज्यांची मातृभाषा मराठी आहे, असा उमेदवार.	

(२) अखिल भारतीय उमेदवारी,—भारतीय नागरिकत्व असणारे उमेदवार, या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

(३) अल्पसंख्याक उमेदवारी,—राज्यांतर्गत असलेल्या आणि शासनाने अधिसूचित केलेल्या एखाद्या विशिष्ट भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्याक समाजातील, महाराष्ट्राचे अधिवासी असलेले उमेदवार या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

(४) अनिवासी भारतीय उमेदवारी,—अधिनियमाच्या कलम २ खंड (ढ) मध्ये दिलेल्या व्याख्येतील अटींची पूर्तता करणारे, उमेदवार या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

(५) विदेशी विद्यार्थी किंवा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले किंवा भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार,—अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (झ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विदेशी विद्यार्थी, नियम २ च्या खंड (ध) मध्ये व्याख्या करण्यात आलेले भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले उमेदवार व अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ण) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार, या प्रवर्गाखाली पात्र आहेत.

(६) **जम्मू व काश्मीर स्थलांतरितांसाठी उमेदवारी,—**

(क) आतंकवादी कारवायांमुळे १९९० पासून जम्मू व काश्मीरमधून भारताच्या कोणत्याही भागात किंवा जम्मू व काश्मीरच्या असुरक्षित सीमाक्षेत्रातून, जम्मू व काश्मीरमधील त्यामानाने सुरक्षित ठिकाणी विस्थापित झालेले आहेत अशा नागरिकांची मुले ; किंवा

(ख) भारतीय प्रशासकीय सेवा (भाप्रसे) किंवा भारतीय पोलीस सेवा (भापोसे) किंवा भारतीय विदेश सेवा (भाविसे) यामधील अधिका-यांची मुले आणि आतंकवादी कारवायांचा बिमोड करण्यासाठी जम्मू व काश्मीरमध्ये बदली झालेल्या, तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी आवेदनपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी कामावर रुजू झालेल्या लष्करी व निमलष्करी दलातील कर्मचा-यांची मुले ; किंवा

(ग) आतंकवादाचा सामना करण्यासाठी कार्यरत असलेल्या जम्मू व काश्मीर पोलीस दलातील कर्मचा-यांची व अधिका-यांची मुले, या प्रवर्गाखाली पात्र असतील.

६. विविध पाठयक्रमांकरिता मंजूर प्रवेशक्षमता व अधिसंख्य जागा,— (१) जे प्राधिकरण संबंधित पाठयक्रमांना मान्यता देण्याकरिता सक्षम आहे त्या प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार आणि संबंधित संलग्न विद्यापीठाने दिलेल्या संलग्नतेनुसार प्रथम वर्ष पदवीपूर्व पाठ्यक्रमाची आणि थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश) स्वतंत्र तुकडी पदवी पाठयक्रमांची मंजूर प्रवेशक्षमता असेल. थेट द्वितीय वर्ष (आनुषंगिक प्रवेश) पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी उपलब्ध जागांची गणना अनुसूची-दोन मध्ये दिल्याप्रमाणे करण्यात येईल.

(२) खाजगी व्यायसायिक शैक्षणिक संस्थामध्ये मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक असलेल्या आणि समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी मान्यता दिल्यानुसार अधिसंख्य जागा प्रवेशासाठी उपलब्ध असतील.

७. जागावाटप,— विविध प्रवर्गातील उमेदवारांकरिता मूळ विद्यापीठातील, मूळ विद्यापीठाबाहेरील आणि राज्यस्तरीय जागांच्या वाटपाची टक्केवारी ही शासन धोरणानुसार, विविध पदवीपूर्व पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्षासाठी अनुसूची-एक मध्ये, आणि थेट दुस-या वर्षासाठी अनुसूची-दोन मध्ये दिल्यानुसार असेल ;

(१) **महाराष्ट्र राज्य उमेदवारीसाठी जागा,—**या नियमाच्या नियम ५(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य उमेदवारी असलेले उमेदवार हे या जागांसाठी पात्र असतील.

(२) **अखिल भारतीय उमेदवारीसाठी जागा,—**या नियमाच्या नियम ५(२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उमेदवारी असलेले उमेदवार हे या जागांसाठी पात्र असतील.

(३) **अल्पसंख्याक कोटयातील जागा,—**या नियमाच्या नियम ५(३) मध्ये नमूद केलेली उमेदवारी असणारे उमेदवार अनुसूची-एक व अनुसूची-दोन मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार उपलब्ध जागांसाठी पात्र असतील. या जागा अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (२), मधील तरतुदीनुसार भरण्यात येतील ;

(४) **संस्थास्तरावरील कोट्यातील जागा,—**संस्थेला, पात्र उमेदवारांना संस्था स्तरावर अनुसूची-एक व अनुसूची-दोन मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार उपलब्ध जागांवर प्रवेश देता येतील, हे प्रवेश खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येतील,

(एक) या नियमाच्या नियम ५(१), ५(२), ५(३), ५(४) आणि ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या कोट्यातील जागांवर प्रवेशासाठी पात्र असतील ;

(दोन) जास्तीत जास्त ५ टक्के जागा, समुचित प्राधिकरणाची मान्यता असल्यास अनिवासी भारतीय उमेदवारामधून संस्था स्तरावर भरता येतील ;

(तीन) अनिवासी भारतीय उमेदवारासाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्यास अशा रिक्त जागा संस्थेस अखिल भारतीय उमेदवारी असणा-या पात्र उमेदवारामधून भरता येतील ;

परंतु या रिक्त जागा भरताना महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणा-या उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्राधान्य देण्यात येईल.

(५) **अधिसंख्य जागा,—**

(क) भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या/भारतीय वंशाच्या व्यक्ती, विदेशी विद्यार्थी, आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले,—

(एक) या नियमाच्या नियम ५(५) मध्ये दिल्यानुसार उमेदवारी असणारे आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य जागासाठी पात्र असतील ;

(दोन) या जागा मंजूर प्रवेश क्षमतेच्या कमाल १५ टक्के किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असतील. या १५ टक्के जागांपैकी एक तृतीयांश जागा आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांसाठी राखीव असतील व दोन तृतीयांश जागा भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेले/ भारतीय वंशाच्या व्यक्ती/विदेशी विद्यार्थी असलेल्या उमेदवारासाठी, राखीव असतील ;

(तीन) या जागा, संस्था, या नियमांच्या नियम ८ मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरतील.

(ख) जम्मू काश्मीरमधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवार,—

(एक) या नियमाच्या नियम ५(६) मध्ये नमूद करण्यात आलेली उमेदवारी असणारे उमेदवार या जागासाठी पात्र असतील;

(दोन) या कोट्यातील जागांची संख्या शासनाच्या धोरणानुसार असेल ;

(तीन) या जागा सक्षम प्राधिकारी भरेल.

८. **गुणवत्ता यादी तयार करणे,—**

(१) **गुणानुक्रम देणे,—** ज्या उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश मिळण्यासाठी आवेदनपत्र सादर करण्याकरिता विनिर्दिष्ट केलेल्या अंतिम दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी आवेदनपत्र सादर केलेले आहे, अशा सर्व पात्र उमेदवारांना गुणानुक्रम देण्यात येईल.गुणवत्ता यादी सामायिक प्रवेश परीक्षेतील प्राप्तांकाच्या किंवा गुणांच्या आधारे किंवा अर्हता परीक्षेतील गुणांच्या आधारे किंवा या नियमाच्या पोटनियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निकषानुसार तयार करण्यात येईल.

(२) **पडताळणीमुळे गुणांमध्ये होणारा बदल,—**गुणांची पडताळणी केल्यामुळे अर्हता परीक्षेमधील गुणांमध्ये फेरबदल झाले असतील आणि संबंधित सक्षम प्राधिका-याने किंवा मंडळाने ते गुण यथोचितरीत्या प्रमाणित केलेले असतील तर, ते गुण, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशासाठीच्या सक्षम प्राधिका-याला किंवा त्याच्या पदनिर्देशित प्रतिनिधींना तात्काळ कळविण्यात येतील. तथापि, अशा बदलामुळे होणारा परिणाम, केवळ प्रवेशाच्या नंतरच्या फेरीसाठी (फे-यांसाठी) विचारात घेण्यात येईल.

(३) **विविध पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी गुणानुक्रम देणे,—** (क) प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रवेश,-(एक) एचएससी उमेदवारांकरिता.- या नियमाच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारी असणा-या उमेदवारांची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिका-याने घेतलेल्या सीईटीत उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा या पाठ्यक्रमांच्या प्रवेशासाठी शासनाने घोषित केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे, तयार करण्यात येईल.

परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) सीईटीमधील गणित विषयातील अधिकतम गुण ;

(ख) सीईटीमधील भौतिकशास्त्र विषयातील अधिकतम गुण ;

(ग) मंडळाच्या किंवा अर्हता परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित व रसायनशास्त्र या विषयातील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(घ) एचएससी परीक्षेच्या गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ड) एचएससी परीक्षेच्या भौतिकशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(च) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(दोन) या नियमाच्या नियम ५(४) व ५(५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनिवासी भारतीय, भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती, भारतीय वंशाच्या व्यक्ती, आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले आणि विदेशी विद्यार्थी या उमेदवाराची गुणवत्ता यादी ही, अर्हता परीक्षेमध्ये उमेदवारास मिळालेल्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, व गणित विषयातील गुणांच्या एकत्रित टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, टक्केवारी सारखीच असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,-

(क) एचएससी परीक्षेत गणित या विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एचएससी परीक्षेत भौतिकशास्त्र या विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी.

(तीन) पदविका व विज्ञान पदवीधारक उमेदवारासाठी,- पदविका व विज्ञान पदवीधारक उमेदवारांची गुणवत्ता यादी ही परीक्षा घेणा-या प्राधिकरणाने ज्या परीक्षेतील गुणांच्या आधारे उमेदवाराला पदविका /पदवी प्रदान केलेली आहे त्या परीक्षेतील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणां-या टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, सारखेच गुण असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,-

(क) एसएससी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एसएससी परीक्षेतील गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एसएससी परीक्षेतील विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(घ) एसएससी परीक्षेतील इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी.

(ख) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रवेश,— गुणवत्ता यादी हि परीक्षा घेणा-या प्राधिकरणाने ज्या परीक्षेतील गुणांच्या आधारे उमेदवाराला पदविका/पदवी प्रदान केलेली आहे त्या परीक्षेतील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या किंवा प्राप्ताकाच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एसएससी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एसएससी परीक्षेतील गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एसएससी परीक्षेतील विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(घ) एसएससी परीक्षेतील इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी.

(ग) प्रथमवर्ष औषधनिर्माणशास्त्र प्रवेश,— (एक) या नियमांच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारासाठीची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सीईटीमध्ये (सामाईक प्रवेश परीक्षेत) उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा या पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी संबंधित समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे, तयार करण्यात येईल :

परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,-

(क) सीईटीमध्ये गणित किंवा जीवशास्त्र विषयातील अधिकतम गुण ;

(ख) सीईटीमध्ये भौतिकशास्त्र विषयातील अधिकतम गुण ;

(ग) अर्हता परीक्षेत किंवा मंडळाने घेतलेल्या परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र व रसायनशास्त्र विषयातील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(घ) एचएससी परीक्षेत गणित किंवा जीवशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ड) एचएससी परीक्षेत भौतिकशास्त्र या विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(च) एचएससी परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी.

(दोन) या नियमाच्या नियम ५(४) व ५(५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनिवासी भारतीय, भारताचे समुद्रपार नागरिकत्व असलेल्या व्यक्ती, भारतीय वंशाच्या व्यक्ती, विदेशी विद्यार्थी आणि आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या उमेदवाराची गुणवत्ता यादी ही, अर्हता परीक्षेमध्ये उमेदवारास मिळालेल्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, व गणित किंवा जीवशास्त्र विषयातील गुणांच्या एकत्रित टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, टक्केवारी सारखीच असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एचएससी परीक्षेत गणित किंवा जीवशास्त्र या विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एचएससी परीक्षेत भौतिकशास्त्र या विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी.

(घ) थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र प्रवेश,—गुणवत्ता यादी ही, उमेदवाराला, परीक्षा घेणा-या प्राधिकरणाने ज्या परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीच्या आधारे पदविका प्रदान केलेली आहे त्या परीक्षेतील गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, टक्केवारी सारखीच असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एचएससी परीक्षेतील भौतिकशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एचएससी परीक्षेतील रसायनशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एसएससी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी;

(घ) एसएससी परीक्षेतील विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी.

(ड) प्रथम वर्ष हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान,– (एक) या नियमाच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारी असलेल्या उमेदवारासाठीची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा या पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने घोषित केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे, तयार करण्यात येईल.

परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एचएससी किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एचएससी (विज्ञान) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(ग) एचएससी (गृहविज्ञान) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(घ) एचएससी किमान क्षमतांवर आधारित असलेले व्यावसायिक पाठयक्रम घेऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(ड) एचएससी (वाणिज्य) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य.

(दोन) या नियमाच्या नियम ५(४), ५(५) व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या उमेदवाराची गुणवत्ता यादी ही एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांच्या टक्केवारीच्या किंवा समतुल्य असलेल्या परीक्षेतील गुणांच्या आधारे तयार करण्यात येईल:

परंतु, टक्केवारी सारखीच असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एचएससी (विज्ञान) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(ख) एचएससी (गृहविज्ञान) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(ग) एचएससी किमान क्षमतांवर आधारित असलेले व्यावसायिक पाठयक्रम घेऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(घ) एचएससी (वाणिज्य) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्राधान्य ;

(च) प्रथमवर्ष वास्तुशास्त्र प्रवेश,- (एक) या नियमाच्या नियम ५(१), ५(२), ५(३) व ५(६) अनुसार उमेदवारासाठीची गुणवत्ता यादी ही, सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेत उमेदवाराला मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा या पाठ्यक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने घोषित केल्यानुसार संबंधित समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या इतर कोणत्याही परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे किंवा समुचित प्राधिकरणाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार तयार करण्यात येईल :

परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) सीईटीमधील अधिकतम गुणांस प्राधान्य ;

(ख) एसएससी परीक्षेच्या गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एसएससी परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी.

(दोन) या नियमाच्या नियम ५(४), ५(५) व आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या उमेदवाराची गुणवत्ता यादी ही एचएससी परीक्षेतील गुणांच्या एकत्रित टक्केवारीच्या किंवा समतुल्य असलेल्या परीक्षेतील गुणांच्या आधारे तयार करण्यात येईल.

परंतु, सारखीच टक्केवारी असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एसएससी परीक्षेच्या गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एसएससी परीक्षेतील एकूण गुणांची अधिकतम टक्केवारी.

९. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप)**.—(१) विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (कॅप) उमेदवारांना प्रवेश देतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (कॅप) टप्पे खाली नमूद केल्याप्रमाणे असतील.—

(क) सक्षम प्राधिका-याने माहिती पुस्तिका प्रदर्शित करणे किंवा प्रसिद्ध करणे;

(ख) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेण्यासाठी उमेदवाराने आवेदनपत्राचा नमुना ऑनलाईन पद्धतीने भरणे;

(ग) उमेदवाराने सुविधा केंद्रावरून व्यक्तिश: कागदपत्राची पडताळणी करून घेणे;

(घ) तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रकाशित करणे, तक्रारी असल्यास त्या दाखल करून घेणे आणि अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित किंवा प्रसिद्ध करणे;

(ड) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या प्रवर्गनिहाय जागा (जागांची रचना) प्रदर्शित करणे;

(च) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीपूर्वी पाठ्यक्रम व संस्था यांचा पसंतीक्रम असणारा ऑनलाइन विकल्प नमुना भरणे व त्यास पुष्टी देणे. उमेदवारांना सक्षम प्राधिका-याने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या पसंतीने संस्था व पाठ्यक्रम याबाबतचे शक्य असतील असे जास्तीत जास्त पसंतीक्रम उतरत्या क्रमाने भरता येतील. उमेदवाराने विकल्प अर्जास पुष्टी दिल्यानंतर, तो अर्ज केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये जागा वाटपासाठी विचारात घेण्यात येईल;

(छ) वाटप केलेली संस्था आणि पाठ्यक्रम दर्शविणारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) पहिल्या फेरीतील तात्पुरते जागा वाटप प्रदर्शित करणे.

(२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप) जागेचे वाटप झालेले असल्यास, जागा स्वीकारण्यापूर्वी, उमेदवाराला खाली तरतूद केल्याप्रमाणे जागा वाटपाच्या नंतरच्या फेरीसाठी (फे-यांसाठी), शैक्षणिक अध्ययनक्रमाकरिता फ्रीझ, स्लाईड किंवा फ्लोट या विकल्पांची निवड करता येईल.

(क) **फ्रीझ :** उमेदवार त्यांना देऊ केलेली जागा स्वीकारतील, त्यांना जागा वाटपाच्या पुढील कोणत्याही फे-यांमध्ये सहभागी होण्याची इच्छा असणार नाही, अशा उमेदवारांचा नंतरच्या प्रवेश फे-यांमध्ये विचार केला जाणार नाही;

(ख) **स्लाईड :** उमेदवार त्यांना देऊ करण्यात आलेली जागा स्वीकारतील आणि त्याच संस्थेमध्ये वरच्या पसंतीक्रमाच्या शैक्षणिक अध्ययनक्रमात प्रवेश देऊ करण्यात आला तर, तो स्वीकारतील असा निर्देश करतील, अशा उमेदवारांचा त्यानंतरच्या प्रवेश फे-यांमध्ये विचार केला जाईल;

(ग) **फ्लोट :** उमेदवार त्यांना देऊ करण्यात आलेली जागा स्वीकारतील आणि इतर कोणत्याही संस्थेमध्ये वरच्या पसंतीक्रमाच्या शैक्षणिक अध्ययनक्रमाला प्रवेश देऊ करण्यात आला तर, तो स्वीकारतील असा निर्देश करतील. अन्यथा त्यांनी सध्या स्वीकारलेला शैक्षणिक अध्ययन क्रम देखील स्वीकारतील, अशा उमेदवारांचा त्यानंतरच्या प्रवेश फे-यांमध्ये विचार केला जाईल;

(घ) ज्या उमेदवारांनी फ्लोट किंवा स्लाईड हा पर्याय निवडलेला असेल आणि ज्यांना, त्यांच्या वरच्या पसंतीक्रमाची जागा मिळाली असेल, अशा वेळी त्या उमेदवारांनी अगोदरच्या फेरीमध्ये स्वीकारलेली जागा ते आपोआप गमावतील;

(ड) ज्या उमेदवारांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमाचा प्रवेश देऊ करण्यात आला आहे अशा उमेदवारांना फ्लोट किंवा स्लाईड हे पर्याय उपलब्ध असणार नाहीत.

(३) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (कॅपची) दुसरी व तिसरी फेरी आयोजित करणे.—(क) दुस-या व तिस-या फे-याकरिता उपलब्ध जागा संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने विकल्प नमुना भरण्यास किंवा पूर्वी भरलेल्या नमुन्यामध्ये बदल करण्यास मुभा देण्यात येईल. या फे-या दरम्यान वाटप करावयाच्या जागा पुढील शर्तींच्या अधिनतेने देण्यात येतील,—

(एक) या फे-या सुरु होण्यापूर्वी उमेदवारांना स्लाईड किंवा फ्लोट या जागा स्वीकृतीच्या विकल्पावरून फ्रीझ किंवा नेमके त्या उलट क्रमाने आपला विकल्प बदलण्यासाठी उमेदवारास त्याने, ज्या अर्ज स्वीकृती केंद्रावर (ए.आर.सी.) प्रवेश शुल्क भरून प्रवेश निश्चिती केलेली असेल त्याच केंद्रावर आवेदनपत्र सादर करता येईल ;

(दोन) ज्या उमेदवारांना अगोदरच्या फे-यांमध्ये कोणतीही जागा मिळालेली नाही अथवा ज्यांनी अगोदरच्या फे-यांमध्ये भाग घेतला नाही (विकल्प अर्ज भरला नसल्याने) किंवा ज्यांनी मिळालेला प्रवेश घेऊन तो रद्द केला आहे किंवा जागा नाकारली आहे अथवा ज्यांनी यापूर्वी फ्रीझ विकल्प निवडला होता परंतु जे या फेरीमध्ये फ्लोट किंवा स्लाईड विकल्प निवडण्यास इच्छुक आहेत असे उमेदवार या फे-यामध्ये भाग घेण्यास पात्र असतील ;

(तीन) ज्या उमेदवारांनी फ्लोट किंवा स्लाईड या विकल्पाची निवड केली असेल आणि जे या फेरीकरितादेखील अर्ज करीत असतील असे उमेदवार, त्यांना पूर्वीच्या फेरीमध्ये वाटप झालेल्या संस्थेचे नाव त्यांच्या पसंतीक्रमाच्या यादीत नमूद करणार नाहीत, संगणकीय प्रणालीद्वारे तो विकल्प यादीच्या शेवटी समाविष्ट करण्यात येईल. एकदा का वरच्या पसंतीक्रमानुसार नवीन जागेचे वाटप करण्यात आले की अगोदर करण्यात आलेले वाटप आपोआप रद्द होईल;

(चार) स्लाईड व फ्लोट हे विकल्प तिस-या फेरीमध्ये वाटप केलेल्या जागांसाठी उपलब्ध असणार नाहीत.

(ख) उमेदवाराने उपस्थिती केंद्रावर उपस्थित होणे आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या वाटपानुसार देऊ केलेली जागा स्वीकारणे.

(४) **संस्थेमध्ये उपस्थित राहून प्रवेश कायम करणे,-** केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) अंतिम फेरीनंतर, उमेदवार त्यास वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहील व त्या संस्थेतील आपला प्रवेश कायम करील.

१०. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) वाटपाचे टप्पे आणि पद्धती.**– केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅपअंतर्गत) येणा-या जागांचे वाटप पुढील पद्धतीनुसार करण्यात येईलः–

(१) **महाराष्ट्र राज्य उमेदवारी असणारे उमेदवार,—** (क) संगणकीकृत पद्धतीने जागा वाटपाचे टप्पे पुढील प्रमाणे आहेत,–

टप्पा एक :- सर्व उमेदवारांसाठी,—

(क) विविध प्रवर्गातील सर्व उमेदवारांचा (खुला, राखीव, पुरुष, महिला) त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार जागा वाटपाकरिता विचार करण्यात येईल;

(ख) मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील, जागांसाठी विचार करण्यात येईल, जर त्यांच्या गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा उपलब्ध होत नसतील तर त्यांच्या संबंधित राखीव प्रवर्गात जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(ग) विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांचा, त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल आणि अशा जागा उपलब्ध होत नसतील तर असे उमेदवार त्यांचा विशेष मागासवर्ग प्रवर्गामध्ये समावेश होण्यापूर्वी ते ज्या मागास प्रवर्गामध्ये होते अशा त्या मूळ मागासवर्ग प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल;

(घ) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल, अशा प्रकारच्या जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल;

(ड) संरक्षण प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांकरिता त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे किंवा अशा जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागांच्या वाटपासाठी विचार केला जाईल.

(च) जर एखाद्या उमेदवारास एकापेक्षा जास्त वर्गवारीमध्ये वाटपासाठी जागा उपलब्ध असल्यास त्याचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येईल,–

(१) महिला उमेदवारासाठीची जागा,

(२) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारासाठीची जागा ,

(३) संरक्षण प्रवर्गातील उमेदवारासाठीची जागा.

टप्पा-दोन : महिलांसाठी राखीव असलेल्या जागांचे पुरुष उमेदवारांना वाटप,—मागासवर्ग प्रवर्गातील किंवा खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना जागांचे वाटप झाल्यानंतर, जर जागा रिक्त राहिल्या तर रिक्त राहिलेल्या जागांचे वाटप संबंधित मागासवर्गातील किंवा खुल्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांना करण्यात येईल.

टप्पा-तीन : विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांकरिता,-जर मागासवर्ग प्रवर्गातील जागा रिक्त राहिल्या तर अशा जागांच्या कमाल २ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत विशेष मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

टप्पा-चार : मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांच्या संबधित गटासाठी,-जर पुढील मागासवर्ग प्रवर्गातील संबंधित गटातील जागा रिक्त राहिल्या तर, त्या रिक्त राहिलेल्या जागांचे वाटप संबंधित गटामधील उमेदवारांना करण्यात येईल,–

गट-१ : (एक) अनुसूचित जाती व बौद्ध धर्मांतरित अनुसूचित जाती (एससी);

(दोन) विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणा-या जमातीसह अनुसूचित जमाती (एसटी).

गट-२ : (एक) विमुक्त जाती/निरधिसूचित जमाती (व्हीजे/डीटी)/ एनटी (ए) ;

(दोन) भटक्या जमाती १ (एनटी-बी).

गट-३ : (एक) भटक्या जमाती २ (एनटी-सी) ;

(दोन) भटक्या जमाती ३ (एनटी-डी) ;

(तीन) इतर मागासवर्ग (ओबीसी).

स्पष्टीकरण:––गट १ साठी, जर अनुसूचित जमाती प्रवर्गातील जागा, त्यातील उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे रिक्त राहिल्या असतील तर त्या जागांचे अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्याकरिता विचार केला जाईल किंवा तसेच उलटपक्षी अनुसूचित जाती प्रवर्गातील जागांबाबत केले जाईल.

टप्पा-पाच : सर्व मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी,-जर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्या असतील तर अशा जागा कोणत्याही मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्यासाठी विचारात घेण्यात येतील.

टप्पा-सहा : विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांसाठी,-जर विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्या असतील तर, अशा जागांचा कोणत्याही विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांना वाटप करण्यासाठी विचार करण्यात येईल.

टप्पा-सात : सर्व उमेदवारांसाठी (कोणत्याही प्रकारचे आरक्षण वगळून),—

सर्व पात्र उमेदवारांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्याकरिता या जागांचा विचार करण्यात येईल;

टप्पा -आठ : सर्व उमेदवारासाठी (कोणत्याही प्रकारचे उमेदवारी प्रकार वगळून)- (एक) रिक्त जागांच्या वाटपासाठी अखिल भारतीय उमेदवारी असलेल्या उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

(दोन) थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (अनुषंगिक प्रवेश) प्रवेशाकरिता जागा शिल्लक राहिल्या असतील तर त्या जागा सर्व पदविकाधारकांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्यात येतील व त्यानंतरसुद्धा जर जागा शिल्लक राहिल्या तर अशा जागा विज्ञान पदवीधारकांना परस्पर गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील.

टप्पा- नऊ : प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी (पदविका व विज्ञान पदवीधारक उमेदवारासाठी),- टप्पा आठ पूर्ण झाल्यानंतर प्रथम वर्षातील जागा रिक्त राहिल्यास त्या जागाचे वाटप पदविकाधारक उमेदवारांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल; व त्यानंतर सुद्धा जागा रिक्त राहिल्यास त्या जागांचे विज्ञान पदवीधारक उमेदवारांना त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल.

(ख) वरील नियमासोबतच, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी (आनुषंगिक प्रवेश) व स्वतंत्र तुकडी प्रवेशासाठी , पाठ्यक्रमनिहाय वाटपासाठी खालील प्रमाणे पद्धती वापरली जाईल,-

(एक) उमेदवाराने ज्या उप गटातील पदविका पाठ्यक्रम पूर्ण केलेला आहे त्याला, त्याच पदवी पाठयक्रमाच्या जागेचे वाटप करण्यात येईल;

(दोन) त्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांचे मुख्य गटातील पदविका पाठ्यक्रम पूर्ण करणा-या उमेदवाराला वाटप करण्यात येईल;

(तीन) त्यानंतर सुद्धा, जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांचे अन्य कोणताही पदविका पाठ्यक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना वाटप करण्यात येईल.

(३) महिला उमेदवारांसाठी राखीव जागांचे वाटपाची पद्धत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र.आरएसव्ही १०१२/CN-१६/१२/१६ए, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ मध्ये दिल्यानुसार असेल.

(२) **अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार,—** या जागांचे पात्र उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेमार्फत पुढील सीईटी च्या किंवा समुचित प्राधिकारणाने विनिर्दिष्ट केलेल्या परीक्षेच्या प्राप्तांकाच्या किंवा गुणांच्या आधारे वाटप करण्यात येईल,–

(क) प्रथम वर्ष अभियांत्रिकी–जेईई (मुख्य)—प्रश्नपत्रिका १ च्या गुणांच्या आधारे व त्यानंतर जागा रिक्त राहिल्यास त्या सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे देण्यात येतील ;

(ख) प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र–सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे ;

(ग) प्रथम वर्ष वास्तुशास्त्र—वास्तुशास्त्र परिषदेव्दारे घेण्यात येणा-या वास्तुशास्त्रामधील राष्ट्रीय अभियोग्यता चाचणी परीक्षेच्या (NATA) व एचएससी परीक्षेतील गुणाच्या आधारे ;

(घ) प्रथम वर्ष हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान—सीईटी परीक्षेतील गुणांच्या आधारे ;

या सर्व जागा " सर्वसाधारण प्रवर्गातील " जागा म्हणून समजण्यात येतील, यामध्ये मागासप्रवर्ग, महिला, विकलांग आणि संरक्षण इ. प्रवर्गातील उमेदवारांकरिता कोणतेही आरक्षण असणार नाही.

(३) **अल्पसंख्यांक कोट्यातील जागा.—**संगणकीकृत जागा वाटपाचे टप्पे खालीलप्रमाणे असतील :—

टप्पा-एक : संस्था ज्या अल्पसंख्याक भाषिक किंवा धार्मिक समाजाकरिता आहे त्या समाजातील, राज्याच्या उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे अल्पसंख्याकासाठीच्या राखीव जागांचे वाटप करण्यात येईल.

टप्पा दोन : जर जागा शिल्लक राहिल्या तर अशा जागांचे वाटप महाराष्ट्र राज्य उमेदवारी उमेदवारांना करण्यात येईल

टप्पा- तीन : त्यानंतर जर जागा शिल्लक राहिल्या तर अशा जागांचे वाटप अखिल भारतीय उमेदवारी उमेदवारांना करण्यात येईल.

(४) **जम्मू काश्मीरमधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवार,—**जम्मू काश्मीरमधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवारासाठी उपलब्ध असलेल्या अधिसंख्य जागांचे वाटप या नियमाच्या नियम ५(६) अनुसार पात्र उमेदवारांना त्यांच्या समुचित प्राधिकरणाने घेतलेल्या प्रवेश परीक्षेतील गुणांच्या व समुचित प्राधिकरणाने निर्दिष्ट केलेल्या पद्धतीने परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्यात येईल, त्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर अशा जागा जम्मू काश्मीरमधून विस्थापित उमेदवारी असणारे उमेदवारांना सक्षम प्राधिकरणाने घेतलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांच्या किंवा प्राप्तांकाच्या आधारे परस्पर गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्यात येईल.

११. **केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅपच्या) पहिल्या, दुस-या आणि तिस-या फेरीद्वारे जागाचे वाटप करणे,—**

(१) कॅपच्या सर्व (पहिल्या, दुस-या व तिस-या) फेरीमध्ये संगणकीय प्रणाली वापरून जागाचे वाटप करण्यात येईल;

(२) कॅपच्या पहिल्या फेरीमध्ये.–

(क) अल्पसंख्यांक संस्थांसाठी,—जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल :—

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (३) मधील टप्पा-१,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (१) मधील टप्पा-१ आणि टप्पा-२,

(तीन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (२).

(ख) अल्पसंख्यांकेतर संस्थांसाठी, जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल :—

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (१) मधील टप्पा-१ आणि टप्पा-२,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (२).

(३) **कॅपच्या दुस-या फेरीमध्ये.—**

(क) अल्पसंख्यांक संस्थासाठी,—जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल :—

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (३) मधील टप्पा-१,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५,

(तीन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (३) मधील टप्पा-२,

(चार) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (२),

(पाच) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (३) मधील टप्पा-३.

(ख) अल्पसंख्यांकेतर संस्थांसाठी, जागांचे वाटप खाली दिलेल्या पद्धतीने व प्राधान्यक्रमाने करण्यात येईल :—

(एक) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-५,

(दोन) या नियमाच्या नियम १० मधील पोट-नियम (२).

(४) **कॅपच्या तिस-या फेरीमध्ये.—**

